पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३६ । किंमत - ४ रू. | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार ३०/०९/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टिवल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

# मोठ्या विश्रांतीनंतर संगमनेरमध्ये मुसळधार

## रस्त्यांना नद्यांचे स्वरूप, वादळी वाऱ्यासह जोरदार सरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळ्यातील प्रदीर्घ विश्रांतीनंतर संगमनेर शहरासह तालुक्यात सोमवारी सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. काही वेळातच पावसाचा जोर वाढल्याने शहरातील विविध भागांत रस्त्यांवर पाणी साचले, तर अनेक ठिकाणी गटारीचे पाणी रस्त्यावर आल्याने नागरिकांची व वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली.



पावसाचा व्हीडीओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

सायंकाळच्या सुमारास आकाशात ढगांची दाटी झाली आणि त्यानंतर जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. काही काळ पावसाचा अक्षरशः जोर वाढल्याने शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. कामानिमित्त घराबाहेर पडलेले नागरिक, दुचाकीस्वार तसेच प्रवाशांना पावसापासून बचाव करण्यासाठी आडोसा शोधावा लागला.

देवगाव-जाखुरी हा वर्दळीचा रस्ता वादळी वाऱ्यामुळे झाड कोसळल्याने काही काळ ठप्प झाला. रस्त्यावर झाड पडल्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहनचालक तसेच प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. झाड हटविण्याचे काम होईपर्यंत वाहतुकीचा खोळंबा झाला.

संगमनेर शहरातील नवीन नगर रस्त्यावर पावसाच्या पाण्यासोबत गटारीचे पाणी रस्त्यावर वाहू लागल्याने नागरिकांची गैरसोय झाली. पावसाळ्यात दरवर्षी या भागात पाणी साचण्याचा प्रश्न निर्माण होत असतानाही त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना झालेल्या नसल्याची नागरिकांची नाराजी आहे. रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने पादचारी आणि दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागली.

संगमनेर बसस्थानका समोरील पुणे-नाशिक महामार्गावर मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे या महत्त्वाच्या रस्त्याला काही काळ तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने वाहनांच्या वेगावर परिणाम झाला. पाण्यातून वाहने मार्गस्थ करताना वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला.

वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाचा परिणाम वीजपुरवठ्यावरही झाला. शहरासह तालुक्यातील अनेक भागांत नेहमीप्रमाणे वीजपुरवठा खंडित झाला. अचानक वीज गेल्याने नागरिकांची गैरसोय झाली. ग्रामीण भागातही काही ठिकाणी पावसासोबत वाऱ्याचा जोर असल्याने वीज वितरण यंत्रणेवर परिणाम झाल्याचे चित्र होते.

यंदा अपेक्षित पाऊस न झाल्याने संगमनेर तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अपुऱ्या पावसामुळे खरीप हंगामातील अनेक पिकांना मोठा फटका बसला असून, उभी पिके जळून गेली आहेत. (पान ४)

# जिल्हा सहकारी बँकेच्या जेवणावळीवर एफडीएची कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्हा सहकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेनंतर सुमारे दोन हजार जणांच्या भोजनाची व्यवस्था करणाऱ्या शेंडी (ता. अहिल्यानगर) येथील सावता केटरर्सकडे अन्न व्यवसायाचा आवश्यक परवानाच नसल्याची धक्कादायक बाब अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत समोर आली आहे. विशेष म्हणजे, सणासुदीच्या काळात एफडीएच्या पोर्टलवर आवश्यक नोंदणी न करताच एवढ्या मोठ्या प्रमाणात भोजन व्यवस्था करण्यात आल्याचेही तपासणीत निदर्शनास आले. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने संबंधित केटरर्सला नोटीस बजावत अन्न व्यवसायाचा परवाना प्राप्त होईपर्यंत आस्थापना बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



केटर्सला परवाना बंधनकारक

जिल्हा सहकारी बँकेची सर्वसाधारण सभा सोमवारी (दि. २८ सप्टेंबर) आयोजित करण्यात आली होती. सभेसाठी उपस्थित राहणाऱ्या सदस्य व मान्यवरांच्या भोजनाची व्यवस्था आनंदधाम रोडवरील केशर गुलाब मंगल कार्यालयात करण्यात आली होती. या भोजन व्यवस्थेचे कंत्राट शेंडी येथील सावता केटरर्सला देण्यात आले होते. तब्बल दोन हजार लोकांसाठी भोजन तयार करण्याचे काम सुरू असतानाच संबंधित केटरर्सकडे अन्न व्यवसायासाठी आवश्यक परवाना नसल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त गौरव जगताप यांना मिळाली.

तसेच, सणासुदीच्या कालावधीत एफडीएच्या पोर्टलवर आवश्यक नोंदणी अथवा नोंद न करता मोठ्या प्रमाणात भोजनाची व्यवस्था केली जात असल्याची बाबही प्रशासनाच्या निदर्शनास आली. त्यानंतर सहायक आयुक्त जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा (पान ४ वर)

# ECINet च्या जाचक अटींवर महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे बोट

## सॉफ्टवेअरमध्ये बदल करण्याची केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मागणी

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात चर्चेत असलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत आता निवडणूक यंत्रणेतील अंतर्गत अडचणीही समोर आल्या आहेत. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पत्र पाठवून ECINet सॉफ्टवेअरमधील काही तरतुदींमुळे स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना कायद्यानुसार उपलब्ध असलेला निर्णयाधिकार वापरण्यात अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यांनी सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक बदल करण्याची मागणी केली आहे.

चोक्कलिंगम यांनी २४ सप्टेंबर रोजी केंद्रीय निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पत्र पाठविल्याचे द इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तातून समोर आले आहे. या पत्रात SIR प्रक्रियेदरम्यान 'अनमॅप्ड' अथवा 'लॉजिकल डिस्क्रेपन्सी' म्हणून चिन्हांकित झालेल्या मतदारांच्या प्रकरणांमध्ये स्थानिक ERO नां अधिक कार्यवाहीचा अधिकार देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.



चोक्कलिंगम यांच्या पत्रात ECINetमध्ये बदल करण्यासंदर्भात चार प्रमुख मुद्दे मांडण्यात आले आहेत. त्यामध्ये कोणत्या प्रकरणात सुनावणी आवश्यक आहे, कोणती कागदपत्रे स्वीकारावीत आणि कोणत्या त्रुटींचे निराकरण स्थानिक पातळीवर करता येईल, याबाबत ERO नां अधिक स्पष्ट अधिकार देण्याचा समावेश आहे.

वैध कागदपत्रे असलेल्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांना प्रत्येक वेळी प्रत्यक्ष सुनावणीसाठी बोलावण्याची आवश्यकता नसावी, यासाठी ECINet मध्ये स्वतंत्र पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

भटक्या-विमुक्त, आदिवासी, बेघर तसेच अन्य वंचित घटकांकडे नियमितपणे उपलब्ध असणारी कागदपत्रे नसण्याची शक्यता लक्षात घेऊन, परिस्थितीनुसार अन्य स्थानिक कागदपत्रे स्वीकारण्याची मुभा देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात महाराष्ट्राने यापूर्वीही अतिरिक्त कागदपत्रांचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविल्याचे वृत्त आहे.

ERO चा निर्णयाधिकार मतदार यादीतील हरकती, त्रुटी आणि दुरुस्त्यांवर निर्णय घेण्याची प्रक्रिया स्थानिक ERO च्या वैधानिक अधिकारांनुसारच होण्यासाठी ECINet मध्ये आवश्यक बदल करण्याची मागणी करण्यात आली. मतदार पडताळणी प्रक्रियेत स्पष्टता राहण्यासाठी वरिष्ठ पातळीवरून देण्यात येणाऱ्या सूचनांना अधिकृत लेखी मार्गदर्शक तत्त्वांचे स्वरूप देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या मागणीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने SIR अंतर्गत नोटीस बजावलेल्या मतदारांसाठी प्रक्रिया काही प्रमाणात सुलभ केली आहे. आता Booth Level Officers (BLO) मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे स्वीकारून ती ECINet वर अपलोड करू शकतात आणि त्यानंतर ERO कडून निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक (पान ३ वर)

## एसआयआर विरोधात ठाकरे बंधू एकत्र



केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त एसआयआर मोहिमेवरून आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात महाराष्ट्राच्या राजकारणात दोन दशकांनंतर अत्यंत ऐतिहासिक राजकीय चित्र पाहायला मिळाले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'शिवतीर्थ' निवासस्थानी संयुक्त पत्रकार परिषद घेत ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत निघणाऱ्या महामोर्चाची अधिकृत घोषणा केली. हा मोर्चा कोणत्याही एका राजकीय पक्षाचा किंवा सत्तेच्या स्पर्धेचा नसून देशाची लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठीचा लढा आहे. त्यामुळे या मोर्चात कोणत्याही राजकीय पक्षाचे झेंडे नसतील, सर्वांच्या हातात फक्त राष्ट्रध्वज तिरंगाच फडकेल अशी साद दोन्ही ठाकरे बंधूंनी जनतेला आणि सर्वपक्षीय नेत्यांना घातली आहे. मनसे आणि शिवसेनेच्या नेतृत्वात हा विराट मोर्चा निघत असून, या लढ्याची दिशा स्पष्ट करण्यासाठी दोन्ही नेते एकत्र आले आहेत.

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रक्कमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
FOLLOW US
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# महाराष्ट्रातील दुष्काळ पाहणीसाठी केंद्र सरकारचे पथक येणार

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची गंभीर दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्र सरकार ३ ऑक्टोबर रोजी विशेष पथके पाठवणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे झालेल्या 'राष्ट्रीय रब्बी मोहीम २०२६' परिषदेत ही माहिती दिली. चौहान यांनी आपणही आपल्या पथकासह दोन्ही राज्यांचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचे सांगितले.



महाराष्ट्रातील दोन-तृतीयांश भागावर दुष्काळाचे सावट आहे. केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी महाराष्ट्रातील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली. महाराष्ट्राने राज्यस्तरावर दुष्काळ जाहीर केला असून, राज्यातील जवळपास दोन-तृतीयांश भागाला या संकटाचा फटका बसल्याचे त्यांनी सांगितले. कर्नाटकातही पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे चौहान यांनी स्पष्ट केले. यंदा अनेक भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामातील पिकांसोबतच आगामी रब्बी हंगामाच्या नियोजनासमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

रब्बी हंगामाची पेरणी करण्यापूर्वी उपलब्ध सिंचनाचे पाणी आणि जमिनीतील ओलावा याचा अंदाज घेण्याच्या सूचना केंद्राने राज्यांना दिल्या आहेत. ज्या भागात पाणी कमी आहे, तिथे जास्त पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांची निवड करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पाण्याची कमतरता असलेल्या भागांत गव्हाऐवजी हरभरा, मसूर आणि गळितधान्यांसारख्या पिकांना प्राधान्य देता येईल. पुरेसे सिंचन उपलब्ध असलेल्या भागांतच जास्त पाणी लागणारी पिके घेण्याचे नियोजन करण्यास सांगण्यात आले आहे.

भात कापणीनंतर पडीक राहणाऱ्या जमिनीत कडधान्ये आणि गळितधान्यांचे क्षेत्र वाढवण्यावरही केंद्राचा भर आहे. हरभरा, मसूर आणि मोहरीच्या उत्पादनाचे उद्दिष्ट ठरवून त्यांची सरकारी खरेदी व्यवस्थित होईल, याची तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळाचा परिणाम केवळ आगामी रब्बी हंगामावरच नव्हे, तर सध्या सुरू असलेल्या खरीप पिकांवरही होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील काही भागांत दुष्काळसदृश परिस्थिती असल्याचे चौहान यांनी सांगितले.

जमिनीतील ओलावा कमी असल्यास पिकांची उगवण व्यवस्थित होत नाही. त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. त्यामुळे पाण्याची उपलब्धता आणि जमिनीतील ओलावा लक्षात घेऊनच पुढील पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ३ ऑक्टोबरला केंद्रीय पथकांची पाहणी

**महाराष्ट्र आणि कर्नाटकातील परिस्थितीचे प्रत्यक्ष चित्र समोर यावे, यासाठी ३ ऑक्टोबरला केंद्राची पथके दोन्ही राज्यांत पाठवली जाणार आहेत. या पाहणीनंतर दुष्काळाची तीव्रता, पिकांचे नुकसान आणि पाण्याची उपलब्धता याबाबत अधिक स्पष्ट माहिती मिळण्याची अपेक्षा आहे. चौहान यांनी स्वत:ही दोन्ही राज्यांचा दौरा करण्याचे सांगितले आहे. दरम्यान, राज्यांना पिकांची स्थिती, पेरणी, पिकांची उगवण, बाजारभाव आणि किडींचा प्रादुर्भाव यावर दर आठवड्याला लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिस्थितीत बदल झाल्यास वेळेत उपाययोजना करता याव्यात हा त्यामागचा उद्देश आहे.**

# राज्यस्तरीय गुणवंत व उपक्रमशील शिक्षक पुरस्कार राहुल गायकवाड यांना प्रदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धांदरफळ खुर्द येथे ज्ञानदानाचे कार्य समर्पित भावनेने करणारे उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षक राहुल बाबुराव गायकवाड यांना ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान (श्रीरामपूर) यांच्यावतीने राज्यस्तरीय गुणवंत व उपक्रमशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला.



गायकवाड यांनी अध्यापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्यावर भर दिला आहे. डिजिटल साधने व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून क्लिष्ट विषयही सोप्या, रंजक आणि विद्यार्थ्यांना सहज समजतील अशा पद्धतीने मांडण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होण्यास मदत झाली आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांचा शोध घेऊन त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देण्याचे काम गायकवाड करीत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता आणि आवड ओळखून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यावर त्यांचा भर आहे.

धांदरफळ खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून शाळेला उपक्रमशील आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित करण्यामध्ये गायकवाड यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उपक्रमशीलतेमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच विविध कौशल्ये आत्मसात करण्याच्या संधी मिळत आहेत. त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांसह इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळत असल्याचे शाळा व परिसरातून सांगण्यात येत आहे. राहुल गायकवाड यांच्या या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

## शिक्षणासाठी सामाजिक बांधिलकीचा स्तुत्य उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सामाजिक बांधिलकी जपत श्री संताजी सेवा ट्रस्ट, संगमनेर यांच्या वतीने सावंत वस्ती, कासारा दुमाला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सावंत वस्ती येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. राजेंद्र लड्डा होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजापूर केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. डोंगरे, माजी नायब तहसीलदार श्री. कृष्णा वालझाडे आणि कृषी मंडळ अधिकारी धनेश कोते उपस्थित होते.

यावेळी श्री संताजी सेवा ट्रस्टचे अध्यक्ष रुपेश वालझाडे, सचिव सागर पन्हाळे, महेश वावळ, संदीप पाबळकर यांच्यासह ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र ठुबे, उपमुख्याध्यापिका सौ. अश्विनी मेहेर (वालझाडे), अंगणवाडी सेविका तसेच पालकवर्गाचीही मोठी उपस्थिती होती. याशिवाय माजी शिक्षण विस्तार अधिकारी सौ. मीनाक्षी पेंडभाजे, सौ. मीनाक्षी वालझाडे, अण्णासाहेब वाडेकर, समाजबांधव हेमंत वालझाडे, सुरेशजी पेंडभाजे आणि स्वप्निल गोरे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणाच्या कार्यात योगदान दिल्यास विद्यार्थ्यांना प्रगतीच्या अधिक संधी उपलब्ध होऊ शकतात, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

शालेय साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत ट्रस्टच्या सामाजिक कार्याला प्रतिसाद दिला. शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरणारा हा उपक्रम समाजासाठी अनुकरणीय असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# वडिलांच्या कष्टाचे चीज! संगमनेरच्या पावभाजी विक्रेत्याच्या मुलाची 'एमबीबीएस'ला गवसणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत असेल तर गरिबी कधीच ध्येयाच्या आड येत नाही, हे संगमनेर येथील एका सामान्य पावभाजी विक्रेत्याच्या मुलाने सिद्ध करून दाखवले आहे. कौटुंबिक आणि आर्थिक अडचणींचा डोंगर समोर असतानाही, संगमनेरच्या मोमीनपुरा भागातील रहिवासी आयान इक्बाल तांबोळी या तरुणाने नीट (NEET) परीक्षेत उज्ज्वल यश मिळवत 'एमबीबीएस' (च.इ.इ.ड.) या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आहे.



कष्टाचे चीज अन् पोटाला चिमटा काढून उभारलेले स्वप्न अनेकदा गरिबीमुळे मुलांनी बापाचाच पारंपरिक व्यवसाय पुढे चालवावा किंवा कुठे तरी मोलमजुरी करावी, अशी परिस्थिती निर्माण होते. मात्र, संगमनेरमधील 'बॉम्बे पावभाजी'चा छोटा स्टॉल चालवणारे इक्बाल भिकन तांबोळी यांनी या परंपरेला छेद देण्याचे ठरवले. कुटुंबाचा संपूर्ण उदरनिर्वाह एका लहानशा स्टॉलवर अवलंबून असतानाही, मुलाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. यासाठी वेळप्रसंगी स्वतःच्या पोटाला चिमटा काढून, आर्थिक चणचणीचा सामना करत त्यांनी आयानच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही.

वडिलांचे काबाडकष्ट डोळ्यांसमोर पाहणाऱ्या आयाननेही या संघर्षाची पूर्ण जाणीव ठेवली. बारावी विज्ञान शाखेत ६५% गुण मिळवल्यानंतर त्याने आपलं पूर्ण लक्ष वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'नीट' (NEET) परीक्षेवर केंद्रित केले. दिवस-रात्र एक करून केलेल्या मेहनतीच्या जोरावर त्याने 'नीट'मध्ये ५१३ गुण मिळवले. त्याचा ऑल इंडिया रँक ७३,६४० तर महाराष्ट्र रँक ५,६३० आला. या उत्तम गुणांच्या बळावर त्याला धुळे येथील नामांकित 'अण्णासाहेब चुडामल पाटील मेमोरियल मेडिकल कॉलेज' येथे एमबीबीएससाठी प्रवेश मिळाला आहे.

आयानच्या या यशात नॅशनल नीट प्रोग्रामचे इनचार्ज श्री. नाझिम तांबोळी सर आणि सहकारी श्री. अतिक इनामदार सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या अभूतपूर्व यशाबद्दल नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे शाळेचे इनचार्ज श्री. नाझिम तांबोळी सर, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने आयान व त्याच्या पालकांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन भावुक वातावरणात नागरी सत्कार करण्यात आला आणि भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

आजच्या काळात अनेक तरुण सोयी-सुविधांचा अभाव किंवा आर्थिक टंचाईचे कारण सांगून माघार घेतात. अशा वेळी आयान तांबोळी आणि त्याच्या पालकांचा हा प्रवास प्रत्येकाचे डोळे उघडणारा आहे.

गरिबी कितीही असो, मुलांच्या शिक्षणात केलेली गुंतवणूक हीच भविष्यातील सर्वात मोठी पुंजी असते. स्वतः सोयी-सुविधांपासून वंचित राहूनही मुलाच्या स्वप्नांना पंख देणारे इक्बाल तांबोळी आज समाजोपयोगी पालकत्वाचे उत्तम उदाहरण ठरले आहेत. यश हे सुविधांवर नाही, तर तुमच्यातील जिद्द आणि 'चिकाटी'वर अवलंबून असते. वडिलांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाची जाणीव ठेवून ज्या वेळी एखादा मुलगा अभ्यास करतो, तेव्हा त्याला डॉक्टर होण्यापासून किंवा यश मिळवण्यापासून कोणतीही गरिबी रोखू शकत नाही.

आयानचा हा प्रवास केवळ एका कुटुंबाचे यश नसून, प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करणाऱ्या प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्यासाठी एक प्रेरणादायी संदेश आहे.

# पुस्तक परीक्षण

# शिक्षणाच्या अनुभवातून उमटलेले चिंतन

### 'शिकवताना जे शिकले'

**शैक्षणिक अनुभवाच्या काही नोंदी**

शिकवताना जे शिकले - शैक्षणिक अनुभवाच्या काही नोंदी' हे डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी यांचे पुस्तक केवळ अध्यापनाचे अनुभव कथन करणारे पुस्तक नसून, शिक्षणव्यवस्थेकडे चिकित्सक आणि संवेदनशील नजरेने पाहायला लावणारे विचारप्रवर्तक लेखन आहे. शिक्षणक्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहिलेल्या लेखिकेने आपल्या प्रत्यक्ष अनुभवांतून शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, समाज आणि मूल्यशिक्षण यांचा परस्परसंबंध प्रभावीपणे या पुस्तकात लेखन रूपाने मांडला आहे.



पुस्तकातील सुरुवातीच्या शुभेच्छा 'ठोस निष्पत्तीचा जागर' हा विशेष शुभेच्छांचा भाग अधिक लक्षवेधी आहे. थश ींशरलह लींी वे ींहशू श्रशरीप? हा प्रश्न संपूर्ण शिक्षणव्यवस्थेला अंतर्मुख करणारा आहे. शिक्षकाने शिकवले म्हणजे विद्यार्थ्याने शिकलेच असे नाही. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष आकलनाची, कौशल्यांची आणि शिकण्याच्या परिणामांची चिकित्सा होणे आवश्यक आहे, हा विचार लेखिकेने अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. केवळ परीक्षा, गुण आणि पाठांतर यापलीकडे जाऊन शिक्षणाचा खरा परिणाम काय झाला? हे तपासण्याची गरज या पुस्तकातील विचार अधोरेखित करतात. लेखिकेच्या अनुभवांतून शिक्षणापासून वंचित, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्नही ठळकपणे समोर येतो. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकातील ज्ञान देणे नव्हे, तर विद्यार्थ्याला स्वावलंबी, सक्षम आणि समाजाभिमुख बनवणे होय, अशी भूमिका पुस्तकातून स्पष्ट होते. प्रत्यक्ष कामातून विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतांना वाव देण्याचे अनेक अनुभव लेखिकेने मांडले आहेत. त्यामुळे पुस्तकातील विचार केवळ सैद्धांतिक न राहता कृतीशील बनतात.

पुस्तकातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे शिक्षणातील प्रयोगशीलता. विद्यार्थ्यांना पारंपरिक चौकटीत अडकवून न ठेवता त्यांच्या अनुभवांशी, कौशल्यांशी आणि परिसराशी शिक्षण जोडले पाहिजे, हा विचार विविध उदाहरणांतून पुढे येतो. हाताने काम करणे, कौशल्याधारित शिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर, संगणक साक्षरता, प्रत्यक्ष अनुभव आणि सामाजिक जाणीव यांना लेखिकेने शिक्षणाचा अविभाज्य भाग मानले आहे.

मूल्यमापनाविषयीचे लेखिकेचे विचारही अत्यंत वास्तववादी व महत्त्वाचे आहेत. केवळ लेखी परीक्षेतील गुणांवर विद्यार्थ्याची प्रगती ठरवणे योग्य नाही. मौखिक काम, गृहपाठ, प्रकल्प, गटचर्चा, विश्लेषणक्षमता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि विद्यार्थ्याला दिलेला अभिप्राय यांचाही विचार झाला पाहिजे. प्रत्याभरण नाही, म्हणजे प्रगती नाही हा विचार शिक्षकांसाठी विशेष चिंतनाचा विषय ठरतो. पुस्तकात भाषाशिक्षणाचाही स्वतंत्र विचार आढळतो. विद्यार्थ्यांना भाषा शिकवताना केवळ भाषेचे ज्ञान देणे पुरेसे नसून त्या भाषेचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत शिकवणे, त्यांच्या आकलनाचा विचार करणे आणि संवादातून भाषा विकसित करणे, यावर लेखिकेने भर दिला आहे. हा अनुभव शिक्षकांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरतो. पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लेखिकेचा आत्मपरीक्षणाचा दृष्टिकोन. स्वत:च्या अध्यापनातील अनुभवांकडेही त्या चिकित्सकपणे पाहतात. शिक्षकाने शिकवताना सतत शिकत राहिले पाहिजे, ही भूमिका पुस्तकाच्या शीर्षकातूनच व्यक्त होते.

पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय आगळे वेगळे आणि विचारपूर्वक घेतलेले जाणवते मुखपृष्ठावरील सरस्वतीचे प्रतीक असलेले चित्र भाषा समृद्धी ज्ञान समृद्धीचे उत्तम उदाहरण जाणवते त्याचबरोबर मुखपृष्ठा वरील विविध फोटोंच्या संकलनावरून केवळ वर्गातच नव्हे तर वर्ग बाहेरही उत्तम शिक्षण देणे शक्य आहे असा संदेश सुरुवातीलाच पोहोचतो. याचबरोबर ग्रंथाली प्रकाशनाने अतिशय अर्थपूर्ण सुबोध आणि अचूक शब्दांच्या वाक्यरचनेत पुस्तकाचे छपाई केली आहे.

खप श्रशरीपळपस ुश ींशरलह रपव ळप ींशरलहळपस ुश श्रशरीप हे विचारवाक्य पुस्तकाच्या मध्यवर्ती भूमिकेला अधोरेखित करते.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण झालेली आव्हानेही पुस्तकात चर्चिली आहेत. मोबाईल, इंटरनेट, चॅट जीपीटी, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या नव्या साधनांमुळे शिक्षणासमोर निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचार करताना लेखिका केवळ विरोध करत नाहीत; उलट बदलत्या परिस्थितीचे भान ठेवून शिक्षणपद्धतीत आवश्यक बदल करण्याची गरज सूचित करतात. त्यामुळे पुस्तकाचे विचार आजच्या काळाशी जोडलेले वाटतात. पुस्तकात शिक्षण आणि मूल्यशिक्षण यांचा सुंदर सहसंबंध मांडला आहे. शिक्षणाचा अंतिम हेतू केवळ रोजगार मिळवून देणे नसून विद्यार्थ्याला संवेदनशील, जबाबदार, नैतिक आणि समाजाभिमुख व्यक्ती बनवणे हा असला पाहिजे. थहशीश ळी ींहश थळीवे ुश हर्रींश श्रींी ळप घपेुश्रशवसश? हा प्रश्न ज्ञानाच्या जोडीने विवेक आणि शहाणपणाची आवश्यकता अधोरेखित करतो.

भाषाशैली- पुस्तकाची भाषा अतिशय सुबोध,साधी, ओघवती, अनुभवप्रधान आणि चिंतनशील आहे. मराठीसोबत आवश्यक तेथे इंग्रजी संज्ञांचा वापर केला आहे. विविध प्रसंग, संवाद, उदाहरणे आणि अनुभवकथन यांमुळे लेखन रंजक झाले आहे. त्यामुळे पुस्तक केवळ शिक्षणशास्त्रातील अभ्यासकांसाठीच नव्हे तर शिक्षक, प्राध्यापक, शिक्षणप्रशासक आणि शिक्षणक्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठीही उपयुक्त ठरते.

पुस्तकाचे वैशिष्ट्य- या पुस्तकाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष अनुभव आणि शैक्षणिक चिंतन यांचा सुंदर मेळ. लेखिकेने स्वत:च्या कार्याचा गौरव करण्यापेक्षा त्यातून निर्माण झालेले प्रश्न, प्रयोग, अडचणी आणि त्यातून मिळालेले धडे वाचकांसमोर ठेवले आहेत. त्यामुळे पुस्तक वाचताना वाचक स्वत:च्या अध्यापनपद्धतीचा विचार करू लागतो.

माझे परीक्षणात्मक मत - 'शिकवताना जे शिकले' शैक्षणिक अनुभवाच्या काही नोंदी.. हे पुस्तक शिक्षकाला केवळ मी काय शिकवतो? हा प्रश्न विचारत नाही, तर माझ्या शिकवण्यामुळे विद्यार्थी खरोखर काय शिकतो? हा अधिक मूलभूत प्रश्न विचारायला भाग पाडते. शिक्षणातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष अध्ययन, मूल्यशिक्षण, सामाजिक बांधिलकी, प्रयोगशीलता आणि शिक्षकाचे आत्मपरीक्षण या सर्व बाबींचा समतोल विचार या पुस्तकात आढळतो.

निष्कर्ष व समारोप- एकूणच, 'शिकवताना जे शिकले - शैक्षणिक अनुभवाच्या काही नोंदी' हे पुस्तक शिक्षकाला अंतर्मुख करणारे, शिक्षणव्यवस्थेला प्रश्न विचारणारे आणि कृतीशील शिक्षणाची प्रेरणा देणारे पुस्तक आहे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना घडविताना स्वत:ही सतत शिकत राहिले पाहिजे, हा अत्यंत महत्त्वाचा संदेश पुस्तकातून मिळतो. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसतो; तो स्वतःच्या अनुभवातून शिकणारा आणि विद्यार्थ्यांसोबत सतत विकसित होणारा असतो. हा या पुस्तकाचा गाभा म्हणता येईल. शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक शिक्षकाने आणि शिक्षणाशी संबंधित व्यक्तीने वाचावे असे हे अनुभवसमृद्ध, चिंतनशील आणि प्रेरणादायी पुस्तक आहे. आजही या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अजूनही वाचक वर्ग तेवढाच रसिक असल्याने विचार प्रवर्तक पुस्तक हे वाचकाच्या बुद्धीला खाद्य पुरवणारेच राहील यात शंकाच नाही.

या पुस्तकाच्या हजारो प्रतींची मागणी वाढो याचबरोबर लेखिकेला अजून नवनिर्मितीचे विचार प्रवर्तक पुस्तक लेखनासाठी खूप खूप शुभेच्छा...

**प्रा. डॉ. सौ अस्मिता हेमंत देशपांडे**

M.A.;M.Ed.;Ph.D.

मुख्याध्यापिका गोखले एज्युकेशन सोसायटीचे

श्री जयरामभाई हायस्कूल नाशिकरोड.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# विजय नागरी पतसंस्थेचा स्तुत्य उपक्रम, अथर्वशीर्ष पठणाचा विक्रम

## नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर आडके यांच्याकडून विशेष कौतुक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित संगमनेर व नाशिक येथील संचालकांच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक संपूर्ण नाशिक शहरात होत आहे. नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर आडके यांनी विजय नागरी पतसंस्थेचे विशेष कौतुक केले. गत तेहतीस वर्षांपासून विजय नागरी पतसंस्था समाजाच्या सेवेसाठी सज्ज आहे. दरवर्षी अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण पतसंस्थेच्या शाखांमार्फत केले जाते. यावर्षी अथर्वशीर्ष पठणाची विक्रमी नोंद करण्यात आली. संगमनेर येथे एक लक्ष अथर्वशीर्ष पठण झाले तर नाशिक येथे ५५ शाळांमध्ये ३५ हजार विद्यार्थ्यांनी दीड लक्ष अथर्वशीर्षाचे पठण करून संपूर्ण नाशिक परिसर दुमदुमून टाकला. या स्तुत्य उपक्रमासाठी विशेष मार्गदर्शन व मेहनत घेत आहेत पतसंस्थेचे संस्थापक संचालक डॉक्टर आशुतोष माळी, पतसंस्थेचे चेअरमन सीए डॉ. पराग सराफ, आणि पतसंस्थेचे संचालक सीए डॉ. देवेंद्र बेलन. त्यांना विशेष सहकार्य करीत आहेत पतसंस्थेचे संचालक श्रीकांत वाघ आणि शिरीष भालेराव आणि नाशिक शाखेतील कर्मचारी राकेश गांगुर्डे, सोमेश कुलकर्णी, आदित्य जानोरकर. गणपती बाप्पा ही बुद्धीची देवता आहे आणि विद्यार्थ्यांना अभ्यासामध्ये घवघवीत यश प्राप्त करण्यासाठी एकाग्रतेची आवश्यकता असते आणि अथर्वशीर्ष पठणामुळे विद्यार्थी अभ्यासामध्ये एकाग्र होऊ शकतात हे वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध झाले आहे आणि म्हणूनच पतसंस्थेने अतिशय स्तुत्य असा उपक्रम राबवला आहे. पतसंस्थेचे कौतुक नाशिक शहरातील सर्व मान्यवर करीत आहेत. विशेष उल्लेखनीय मान्यवर म्हणजे नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मारुती कुलकर्णी, पंचवटी एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अभय चोकसी, नाशिक एज्युकेशन सोसायटीचे दिलीप फडके, लोकमान्य शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष उदय जी शेवतेकर तसेच केंब्रिज विद्यालय इंदिरानगरचे ट्रस्टी भारती रामचंद्रन, मानवधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कोल्हे,टाइम्स ऑफ इंडियाचे नाशिक शाखा अधिकारी रूपेश शर्मा या सर्वांनी विजय नागरी पतसंस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. विविध शाळांमध्ये अथर्वशीर्ष पठणाच्या वेळी विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, गणेश स्तवन, गणेश चालीसा इत्यादी आगळ्यावेगळ्या कलाकृतींनी गणेशाची आराधना केली. अथर्वशीर्ष पठणाने संपूर्ण नाशिक शहरच भक्तिमय वातावरणाने भरून गेले. विजय नागरी पतसंस्थेच्या या उपक्रमाला विविध शाळा, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# साहिल वाकोडे मृत्यू प्रकरणी स्वतंत्र चौकशीची काँग्रेसची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - IIT मुंबई येथील विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, या मागणीसाठी आज अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने प्रांत अधिकारी संगमनेर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष बंटी यादव, पँथर माणिकराव यादव, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत थोरात, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते विनोद गायकवाड, तालुकाध्यक्ष अशोक शेळके यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

IIT मुंबईसारख्या प्रतिष्ठित संस्थेत दलित विद्यार्थ्याला जातीय शिवीगाळ व मानसिक छळाला सामोरे जावे लागल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. केवळ माफी आणि एका प्राध्यापकाच्या निलंबनाने हा विषय संपणार नाही, दोषींवर कठोर कारवाई करून कुटुंबाला न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

## काँग्रेसचे श्रीरामपूरच्या प्रांताधिकाऱ्यांना निवेदन; कारभाराच्या चौकशीचीही मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर-: मुख्य निवडणूक आयुक्त श्री. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीण उत्तरच्या वतीने करण्यात आली. याबाबत श्रीरामपूरच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. इंडियन एक्स्प्रेसमधील वृत्ताचा दाखला देत, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि अन्य दोन निवडणूक आयुक्त यांच्यात अनेक निर्णयांबाबत मतभेद झाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. त्यांच्या मतांच्या विरोधात मुख्य निवडणूक आयुक्तांनी अनेकदा निर्णय घेतल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

मतदार याद्यांच्या विशेष पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत पात्र मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप करत, पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळणे हा लोकशाही प्रक्रियेवरील गंभीर आघात असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. मतदार याद्यांबाबत पारदर्शकता, निष्पक्षता आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या 'वोट चोरी'च्या मुद्द्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी काँग्रेसने केली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेण्यात यावा, त्यांच्या कार्यकाळातील निर्णयांची कायदेशीर तपासणी करण्यात यावी, तसेच आयोगाच्या निर्णयांवर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती किंवा घटकांचीही चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, महाराष्ट्र प्रदेश सचिव सौ. प्रभावती घोगरे, संगमनेर तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, कार्याध्यक्ष अमोल शेलकर, अभिजित लुनिया यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजर्षी छत्रपती शाहू गुणवत्ता पुरस्काराने सिद्धार्थ नाईट हायस्कूलच्या सोनालीचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - बहुजन शिक्षण संघाचे सिद्धार्थ नाईट हायस्कूल, संगमनेर येथील मार्च २०२६ च्या SSC बोर्ड परीक्षेत विद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या सोनाली माणिक खंडागळे हिने अनुसूचित जाती प्रवर्गातून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या गुणवत्तेची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून दिला जाणारा राजर्षी छत्रपती शाहू गुणवत्ता पुरस्कारासाठी मुख्याध्यापक विकास जगताप यांनी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधून तिचे नामांकन पाठविले होते. या नामांकनातून संपूर्ण जिल्ह्यातील १३३ विद्यार्थ्यांची निवड झाली असून संगमनेर तालुक्यातून एकमेव विद्यार्थिनी म्हणून सोनाली माणिक खंडागळे हिची निवड झाली आहे. तिला रुपये ५,००० चा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

सिद्धार्थ नाईट हायस्कूलच्या आजवरच्या इतिहासात या पुरस्काराने सन्मानित होणारी सोनाली ही पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. त्यामुळे बहुजन शिक्षण संघाच्या संस्थात्मक वाटचालीत तसेच सिद्धार्थ नाईट हायस्कूलच्या शैक्षणिक इतिहासात या यशाची विशेष नोंद झाली आहे.`.



बहुजन शिक्षण संघाचे सिद्धार्थ नाईट हायस्कूल, संगमनेरची स्थापना माजी मंत्री दादासाहेब रुपवते यांच्या प्रेरणेतून सन १९७० मध्ये झाली. स्थापनेपासून विद्यालयाने विविध क्षेत्रांत प्रगती साधत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला विशेष महत्त्व दिले आहे. विविध शैक्षणिक व विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकविण्याचे काम विद्यालयाकडून सातत्याने केले जात आहे. सोनालीची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही तिने शिक्षणाची जिद्द कायम ठेवत मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. तिच्या यशाबद्दल संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ड. संघराज रुपवते, अध्यक्ष बी. आर. कदम, सचिव मिलिंद मामा गायकवाड, विश्वस्त उत्कर्षाताई रुपवते, विश्वस्त एम. डी. सोनवणे, कार्यकारी रजिस्ट्रार राजेंद्र एडके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ए. पी. बनसोडे, हिरालाल पगडाल ,सूर्यकांत शिंदे तसेच मासूम संस्था मुंबईच्या संचालिका निकिता केतकर, शशिकांत गवस, पाटील सर, मासूम संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक विकास जगताप, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्गातून अभिनंदन करण्यात आले.

सिद्धार्थ नाईट हायस्कूलमध्ये वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. दिवसभर कष्टाची कामे करून रात्री शिक्षण घेणारे विद्यार्थी, दुकाने व हॉटेलमध्ये काम करणारे विद्यार्थी, असंघटित क्षेत्रातील कामगार तसेच शिक्षणापासून वंचित महिला येथे शिक्षण घेत आहेत.

# श्री ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली पर्यावरण व कायदेविषयक जनजागृती



युवावावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त तसेच अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'निर्माल्य संकलन' आणि 'एक पोस्टर - एक कायदा' हे जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले.

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारे निर्माल्य नदी, तलाव व इतर जलस्रोतांमध्ये विसर्जित होऊ नये आणि पर्यावरणाचे प्रदूषण टाळता यावे, या उद्देशाने निर्माल्य संकलन करण्यात आले. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. याचबरोबर 'एक पोस्टर - एक कायदा' या उपक्रमांतर्गत ४० स्वयंसेवकांनी माहितीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, हुंडाबळी कायदा, बाल कामगार कायदा, बालविवाह कायदा, अशा २० विविध महत्त्वाच्या कायद्यांची सामान्य नागरिकांना सहज समजेल अशा सोप्या भाषेत माहिती देणारी हस्तनिर्मित पोस्टर्स तयार केली. या पोस्टर्सच्या प्रदर्शनातून नागरिकांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध सामाजिक प्रश्न, नागरिकांचे अधिकार, जबाबदाऱ्या तसेच दैनंदिन जीवनाशी संबंधित कायदेशीर तरतुदी यांची माहिती विद्यार्थ्यांनी पोस्टर्सच्या माध्यमातून मांडली. पर्यावरण संवर्धन आणि कायदेविषयक जनजागृती या दोन्ही बाबींना एकत्रितपणे लोकाभिमुख स्वरूप देणाऱ्या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नागराज खराडे यांनी उपक्रमाचे नियोजन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. राहुल देशमुख, प्रा. रामदास सोन्नर, डॉ. प्रतिक शिंदे, प्रा. बालाजी नरवटे, कार्यालयीन अधीक्षक सचिन वालझाडे, संतोष खाडे, विद्यार्थी व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत विहान खेमनरला सुवर्णपदक




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - श्रीगोंदा येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत मालपाणी विद्यालयाचा इयत्ता नववीतील खेळाडू विहान नारायण खेमनर याने अत्यंत चमकदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या उत्कृष्ट यशासह विहानने आगामी विभागीय तायक्वांदो स्पर्धेसाठी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

स्पर्धेत विहानने सुरुवातीपासूनच उत्कृष्ट तंत्र, वेग आणि शिस्तीचे प्रदर्शन करत आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. विहानला तायक्वांदो प्रशिक्षक लक्ष्मण शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले .

विहानच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सर्व संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, क्रीडा शिक्षिका तथा पर्यवेक्षिका रंजना पवार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी त्याचे कौतुक करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून ECINet च्या ...

पान १ वरून

मतदाराला प्रत्यक्ष सुनावणीसाठी कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य राहिलेले नाही. महाराष्ट्रातील SIR प्रक्रियेत दावे व हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत १२ ऑक्टोबर २०२६पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्राप्त दावे व हरकतींची छाननी १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करून अंतिम सुधारित मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, मतदारांना त्यांच्या नावातील, पत्त्यातील अथवा अन्य नोंदीतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी विशेष शिबिरे आणि मदत केंद्रांच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर SIR २०२६ साठी प्रारूप मतदार यादी, दावे-हरकती, ASDD यादी आणि अन्य महत्त्वाची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# खो-खो स्पर्धेत कळसेश्वर विद्यालयाच्या मुलींचा संघ उपविजेता

युवावार्ता (प्रतिनिधी) कळस बु. - अकोले तालुका क्रीडा समितीच्यावतीने आयोजित तालुकास्तरीय सांघिक क्रीडा स्पर्धेत खो-खो क्रीडा प्रकारात कळसेश्वर विद्यालय, कळस बु. येथील १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. अभिनव पब्लिक स्कूल, अकोले येथे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. खो-खोच्या १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या सामन्यांमध्ये कळसेश्वर विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. शेवटपर्यंत संघर्ष करत मुलींनी तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवत उपविजेतेपदावर आपले नाव कोरले.

या विजयी संघात स्वराली वाकचौरे, अरुंधती कातोरे, गौरी वाकचौरे, आदिती कर्पे, गुंजन कातोरे, ईश्वरी उगले, गौरी साळुंके, ज्ञानदा वाकचौरे, श्रद्धा शिर्के, श्रेया शिर्के, ज्ञानेश्वरी कर्पे आणि अबोली वाकचौरे या विद्यार्थिनींचा समावेश होता. विद्यार्थिनींना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नंदा गोपाळे यांच्या प्रेरणेतून क्रीडा शिक्षक शिवाजी आवारी व कुमार पालवे तसेच सहशिक्षक मच्छिंद्र साळुंखे, गीतांजली खरबस, केशव महाले, मनीषा शिंदे, प्रशांत जाधव व प्रतीक्षा घुले यांचे



मार्गदर्शन लाभले. संघाच्या या यशाबद्दल अगस्ती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सौ. शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी, शिरीष नाईकवाडी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास वाकचौरे, उपाध्यक्ष मनीषा बोऱ्हाडे, समितीचे सर्व सदस्य तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## संपादकीय...

### 'लाईक'च्या गर्दीत खरे कौतुक हरवले

आजच्या डिजिटल युगात एखाद्या व्यक्तीने केलेल्या कामाचे कौतुक होण्यासाठी आता त्याच्या पाठीवर थाप मारण्याची, दोन चांगले शब्द बोलण्याची किंवा प्रत्यक्ष भेटून अभिनंदन करण्याची गरज उरलेली नाही. मोबाईलच्या पडद्यावर आलेला एक 'लाईक', एखादी 'हार्ट'ची खूण किंवा दोन शब्दांची कमेंट म्हणजेच कौतुक, अशी नवी व्याख्या तयार झाली आहे. प्रश्न एवढाच आहे की, या 'लाईक'च्या गर्दीत खरे कौतुक मात्र कुठे हरवले? सोशल मीडिया हा आजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सप यांसारख्या माध्यमांनी संवादाची दारे खुली केली. एखाद्या गावातील कलाकाराचे काम काही क्षणांत जगभर पोहोचू शकते. एखाद्या विद्यार्थ्याचे यश हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकते. एखाद्या सामाजिक कार्याची दखल मोठ्या प्रमाणावर घेतली जाऊ शकते. या माध्यमांचे महत्त्व नाकारता येणार नाही. पण प्रश्न माध्यमांचा नाही; प्रश्न आहे तो आपल्या मानसिकतेचा. आज अनेकदा एखाद्या व्यक्तीच्या कामाचे मूल्य त्याने केलेल्या कामावर नव्हे, तर त्याला मिळालेल्या 'लाईक्स'च्या संख्येवर ठरवले जाते. पोस्टला दहा हजार लाईक्स मिळाले तर ती व्यक्ती यशस्वी; हजार लाईक्स मिळाले तर ठीकठाक; आणि शंभर लाईक्स मिळाले तर जणू काही तिच्या कामाला किंमतच नाही-अशी धोकादायक तुलना नकळत समाजात रुजत आहे. यातून सर्वात मोठा धोका निर्माण होतो तो स्वतःच्या मूल्यांकनाचा. एखादा तरुण मेहनत करून सुंदर चित्र काढतो, कविता लिहितो, संशोधन करतो, व्यवसाय उभा करतो किंवा समाजासाठी काहीतरी चांगले काम करतो. पण त्याच्या पोस्टला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही, तर तो निराश होतो. उलट एखादी वरवर आकर्षक, विनोदी किंवा वादग्रस्त पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली की तिच्या लोकप्रियतेला यशाचे प्रमाणपत्र समजले जाते. परिणामी मेहनतीपेक्षा प्रसिद्धी, गुणवत्तेपेक्षा दृश्यता आणि कर्तृत्वापेक्षा 'एंगेजमेंट' महत्त्वाची वाटू लागते. खरे कौतुक मात्र वेगळे असते. ते संख्येत मोजता येत नाही. एखाद्या शिक्षकाने विद्यार्थ्याच्या पाठीवर ठेवलेला हात, पालकांनी मुलाला दिलेले प्रोत्साहन, सहकाऱ्याने मनापासून म्हटलेले 'तू छान काम केलेस', किंवा एखाद्या अनोळखी व्यक्तीने केलेली छोटीशी प्रशंसा-यात जी आत्मीयता असते, ती हजारो डिजिटल प्रतिक्रियांमध्येही मिळेलच असे नाही. 'लाईक' एका क्षणात मिळतो आणि पुढच्या क्षणी विसरला जातो. खरे कौतुक मात्र माणसाच्या मनात राहते. ते आत्मविश्वास वाढवते, अपयशाच्या काळात उभे राहण्याची ताकद देते आणि पुन्हा चांगले काम करण्याची प्रेरणा देते. आज आणखी एक विचित्र प्रवृत्ती दिसून येते. अनेकदा आपण एखाद्याचे काम पाहतो, आवडतेही; पण प्रत्यक्ष कौतुक करण्यासाठी दोन शब्द बोलण्याऐवजी फक्त 'लाईक' करून पुढे जातो. मित्राने पुस्तक लिहिले, परिचिताने व्यवसाय सुरू केला, विद्यार्थ्याने मोठे यश मिळवले, एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याने उल्लेखनीय काम केले- आपली प्रतिक्रिया अनेकदा एका अंगठ्याच्या चिन्हापुरती मर्यादित राहते. यामुळे सामाजिक संवादाचा एक महत्त्वाचा भाग कमी होत आहे. कौतुक ही केवळ प्रतिक्रिया नसून नात्यांना बळ देणारी भावना आहे. ती व्यक्त करण्यासाठी वेळ द्यावा लागतो, समोरच्या व्यक्तीचे काम समजून घ्यावे लागते आणि मनापासून शब्द बोलावे लागतात. याहून गंभीर बाब म्हणजे सोशल मीडियाने कौतुकाचेही एक बाजारमूल्य तयार केले आहे. काही वेळा प्रसिद्ध व्यक्तींना मिळणारे लाखो लाईक्स पाहून सामान्य माणूस स्वतःची तुलना त्यांच्याशी करू लागतो. स्वतःचे आयुष्य कमी महत्त्वाचे आणि दुसऱ्यांचे आयुष्य अधिक सुंदर वाटू लागते. परंतु सोशल मीडिया आपल्याला लोकांच्या आयुष्याचा निवडक भाग दाखवतो. त्या चमकदार चित्रामागची मेहनत, संघर्ष, अपयश आणि असुरक्षितता दिसत नाही. म्हणूनच आज गरज आहे ती 'लाईक'विरोधी होण्याची नाही, तर लाईकच्या पलीकडे पाहण्याची. सोशल मीडिया वापरूया, डिजिटल कौतुक करूया; पण प्रत्यक्ष आयुष्यातील माणसांना विसरू नका. मुलाने चांगले काम केले तर फक्त त्याच्या फोटोला लाईक करू नका-त्याला मिठी मारा. मित्राने यश मिळवले तर कमेंट करण्याऐवजी फोन करा. सहकाऱ्याने चांगले काम केले तर त्याच्या समोर त्याचे कौतुक करा. एखाद्याने समाजासाठी योगदान दिले असेल तर त्याची दखल प्रत्यक्ष घ्या. कारण प्रत्येक माणसाला प्रसिद्धीपेक्षा मान्यता हवी असते. प्रत्येकाला हजारो लोकांनी पाहावे असे नसते; पण काही माणसांनी मनापासून 'तू केलेले काम महत्त्वाचे आहे' असे म्हणावे, ही गरज असते. आज आपण मुलांना किती लाईक्स मिळाले हे विचारण्यापेक्षा त्यांनी काय शिकले, काय निर्माण केले आणि कोणाला मदत केली हे विचारायला हवे.

# गुंजाळ फाउंडेशनचा आरोग्यदायी उपक्रम

## ४४ व्या मोफत होमिओपॅथिक शिबिराचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि वृंदावन जनरल हॉस्पिटलच्या वतीने ४४ व्या मोफत होमिओपॅथिक सर्व रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गुंजाळ फाउंडेशनचा हा आरोग्यदायी उपक्रम २ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत चंदनापुरी घाटातील वृंदावन हॉस्पिटलमध्ये होणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव राहुल गुंजाळ यांनी दिली.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली या मोफत होमिओपॅथिक निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १९८३ सालापासून गेली ४४ वर्षे डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने या शिबिराचे आयोजन केले जात आहे. १९८४ साली अहमदनगर येथे तत्कालीन जिल्हाधिकारी लखीना याच्या उपस्थितीत झालेल्या शिबिराला नगरकरांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. प्रख्यात होमिओपॅथिक तज्ञ डॉ. आर. एस. पाळेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात आणि संगमनेरचे तत्कालीन प्रांताधिकारी झेंडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत १९८३ साली सुरू करण्यात आलेला हा आरोग्य यज्ञ अहिल्यानगर, नाशिक, कोपरगाव, शिर्डी, श्रीरामपूर, राहुरी, पारनेर अशा अनेक ठिकाणी आयोजित करण्यात आला. या शिबिरांसाठी प्रख्यात होमिओपॅथिक तज्ञ डॉ. मुकेश बत्रा यांचे मार्गदर्शन मिळाले. कोपरगाव येथील डॉ. जाधव यांच्या हॉस्पिटलला घेतलेल्या शिबिरप्रसंगी साकुरी येथील कन्याकुमारी आश्रमाच्या प्रमुख साध्वी गोदावरी माता, काटोलचे महंत गुलाब बाबा, जनार्दन स्वामी यांचीही उपस्थिती आणि आशीर्वाद लाभले. १९८५ साली नाशिक येथे झालेल्या शिबिरप्रसंगी तत्कालीन खा. दौलतराव आहेर आणि आ. भिकचंद दोंदे हे उपस्थित होते.

महात्मा गांधींच्या विचारांचे पाईक म्हणून ग्रामीण भागाच्या विकासात मोलाचे योगदान देतानाच संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक कार्याला नेहमीच प्राधान्य दिले. गांधी जयंतीच्या निमित्ताने आयोजित शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांना तपासणी व औषधोपचार सुविधा वर्षभरासाठी मोफत दिल्या जातात. आजवर एक लाखाहून अधिक रुग्णांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांची होमिओपॅथिक तज्ञांकडून तपासणी करण्यात येणार असून त्यांना मोफत औषधी दिली जाणार आहेत. गरजू रुग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन कॉलेजच्या प्राचार्या डॉ. वैशाली काकड आणि वृंदावन जनरल हॉस्पिटलचे सीनियर मेडिकल ऑफिसर डॉ. सुनील मदने यांनी केले आहे.

# ह. भ.प. बद्रीनारायणजी मुंदडा यांचे निधन



अकोले (प्रतिनिधी )

अकोले माहेश्वरी समाजाचे प्रमुख पंच व अगस्ति देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त ह. भ.प. बद्रीनारायनजी मोतीलालजी मूंदड़ा(वय ९१,रा. अकोले ) यांचे आज रविवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले . त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी,सुना, नातवंडे,पतवंडे असा परिवार आहे.

अगस्ती देवस्थान ट्रस्टचे अनेक वर्ष त्यांनी अध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली.अगस्ती प्रासादिक भजणी मंडळाचे ते संस्थापक होते.जुन्या पिढीतील किराणा व्यवसायिक म्हणून ते सर्वदूर परिचित होते.

अकोले येथील व्यापारी श्यामसुंदर मुंदडा व सौ.विमल श्यामसुंदर काबरा यांचे ते वडिल होत. भाजपच्या ज्येष्ठ नेत्या सुनिता रामेश्वर मुंदडा व ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळेच्या चेअरमन स्मिता श्यामसुंदर मुंदडा यांचे ते सासरे होत. प्रतीक मुंदडा, ॲड. योगेश मूंदड़ा,सौ.प्राची स्वप्निल जाजू यांचे ते आजोबा होत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या महात्मा फुले चौक येथील राहत्या घरी विविध क्षेत्रातील मान्यवर, अगस्ती देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त, व्यापारी, नातेवाईकांनी अंत्यदर्शना साठी गर्दी केली होती. अकोले येथील अमरधाम मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व कॉलेजच्या तीनही संघांचा विजय



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विदयमाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन सह्यादी जूनियर कॉलेज, संगमनेर येथे करण्यात आले. या स्पर्धेत अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या १७ वर्षे मुले, १९ वर्षे मुले आणि १९ वर्षे मली या तिन्ही गटांतील संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम सामन्यात विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला असल्याची माहिती शाळेचे प्राचार्य आशिष कुमार यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते पुढे म्हणाले की, अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धांमध्ये घडणारे विद्यार्थी तयार व्हावे यासाठी विशेष परिश्रम घेतले आहे त्याचाच एक भाग म्हणून १७ वर्षे मुले या गटात कर्णधार पंकज गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूषण चव्हाण, प्रेम गवळी, अथर्व देवरासे, आयुष खाने, रोहित गायकवाड, मेघराज भोये. साई चौरे, हिमांश भरसाट, प्रशांत महाले, अमित घारे व सुरज बन्सी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले संघाने अंतिम सामना जिंकत प्रथम क्रमांक मिळवला.

१९ वर्षे मुले या गटात कर्णधार धनेश बागुल यांच्या नेतृत्वाखाली कल्पेश सातपुते, ओंकार गीते, अतुल आवारी, यशराज देशमुख, सौरभ टोपले, वेदांत महाले, निखिल गायकवाड, राजू अवतार, तुकाराम गावित, चंदू पीठे व राधेश्याम सुतार यांनी संघाला प्रथम क्रमांकाचे विजेतेपद मिळवून दिले.

तर १९ वर्षे मुली या गटात कर्णधार अश्विनी भोये यांच्या नेतृत्वाखाली जागृती सातपुते, कावेरी चौधरी, जानवी चौधरी, जयश्री धूम, योगेश्वरी भोये, निशा पवार, मयुरी पवार, लीना भरसट, कविता शिंदे व मृणाल भालेराव यांनी शानदार कामगिरी करत अंतिम सामना जिंकला आणि प्रथम क्रमांक पटकावत शाळेचे नाव उज्वल केले. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक रविंद्र कदम, रोहित गाडे, जयराम दूशिंग व सौ वृषाली भागवत यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, संस्थेचे विश्वस्त माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. शरयू देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्राचार्य व्ही. बी. धुमाळ, शाळेचे प्राचार्य आशिष कुमार, सर्व विभाग प्रमुख व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# स्वच्छतेसाठी नियमांची कडक अंमलबजावणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बैठका घेण्यात येत आहेत. या बैठकींमध्ये ग्रामपंचायत सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि ग्रामस्थ सहभागी होत आहेत. घरगुती कचऱ्याचे चार प्रकारात वर्गीकरण, प्रत्येक गावात सेग्रीगेशन शेड, ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती आणि कचरा वाहतुकीसाठी झाकलेली घंटागाडी उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या हॉटेल, मंगल कार्यालये व संस्थांची नोंदणी करून त्यांना एइथत्रझ्ठ प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच ग्रामपंचायतींमध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी पूर्णवेळ कर्मचारी उपलब्ध करण्याचे निर्देश आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. वारंवार नियमभंग करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर पाणी अथवा वीजपुरवठा बंद करण्यासारखी कारवाईही होऊ शकते. जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करून ग्रामीण व शहरी भागातील कामांचे संनियंत्रण करण्यात येणार आहे. स्वच्छ, निरोगी आणि पर्यावरणपूरक गावांसाठी ग्रामस्थांनी कचरा वर्गीकरण व योग्य विल्हेवाटीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले आहे. गावांमध्ये वर्षानुवर्षे साचलेल्या जुन्या कचऱ्याची (लिगसी वेस्ट) शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासोबतच डम्पसाईटचे पुनरुज्जीवन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींनी कचरा संकलन, वर्गीकरण, प्रक्रिया आणि विल्हेवाट या सर्व टप्प्यांवर नियमित देखरेख ठेवावी. तसेच नागरिकांनी घरातूनच कचऱ्याचे वर्गीकरण करून ग्रामपंचायतीच्या कचरा संकलन व्यवस्थेला सहकार्य करावे, असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

## पान १ वरून मोठ्या विश्रांतीनंतर...

अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

अशा परिस्थितीत सोमवारी झालेल्या पावसामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. जमिनीतील पाणीसाठा वाढण्यास तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेला या पावसामुळे काही प्रमाणात मदत होण्याची शक्यता आहे. मात्र, सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता केवळ एक-दोन पावसाच्या सरी पुरेशा नसून तालुक्याला आणखी दमदार आणि सातत्यपूर्ण पावसाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, सोमवारी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून, आगामी काळात आणखी पाऊस पडतो का, याकडे संगमनेर तालुक्यातील नागरिकांसह शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान मोठ्या विश्रांतीनंतर पाऊस पडल्याने काहीसा दिलासा मिळाला.

## पान १ वरून दोन हजार जणांच्या...

अधिकारी साजिदा मुल्ला यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान सावता केटरर्सकडे अन्नसुरक्षा व मानके कायद्यानुसार आवश्यक असलेला अन्न व्यवसाय परवाना उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे विनापरवाना अन्न व्यवसाय सुरू असल्याची बाब प्रशासनाच्या तपासणीत उघड झाली. सुमारे दोन हजार नागरिकांच्या भोजन व्यवस्थेचे कंत्राट घेऊन प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर अन्न तयार केले जात असताना आवश्यक परवाना नसल्याने अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. संबंधित केटरर्सला नोटीस बजावून सात दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, आवश्यक अन्न व्यवसाय परवाना प्राप्त होईपर्यंत संबंधित आस्थापना बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याने या कारवाईकडे अन्न व्यवसाय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.


**पाहिजेत**

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**

ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431

**पाहिजेत**

नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष-१/ स्त्री -१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

**पाहिजेत**

दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**

अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084







# हॉटेलचालकांना FDA चा दणका

## महाराष्ट्रातील 30 हॉटेल- आस्थापनांचे परवाने निलंबित



मुंबई (वृत्तसंस्था)

अन्न- औषध प्रशासनाने गेल्या आठवड्याभरात महाराष्ट्रातील ३० ठिकाणच्या हॉटेल आणि आस्थापनांचे परवाने निलंबित केले आहेत. शिवाय, २६ आस्थापनांची तपासणी करत लाखो रूपयांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमध्ये एफडीएकडून २२ जणांवर गुन्हा दाखल करत ३० जणांना अटक केली आहे. एफडीएच्या ह्या धडक कारवाईमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील दुकानदारांचे आणि हॉटेल चालकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर एफडीएने केलेल्या कारवाईमध्ये हजारो किलोंचा साठा जप्त करत करोडो रूपयांचा मुद्दे माल जप्त केला आहे.

२३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२६ दरम्यान सणासुदीच्या निमित्ताने अन्न- औषध प्रशासनाने धडक कारवाईमध्ये विविध जिल्ह्यांत मिठाई, दूध- दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, तांदूळ, ड्रायफ्रूट्स, नमकीन, फरसाण, चहा, मसाले, सॉस, नूडल्स, वेफर्स आणि इतर अन्नपदार्थांचा मोठ्या प्रमाणात साठा जप्त केला आहे. हा एकूण जप्त केलेला साठा ५०,६०१.७८ किलोंचा असून याची किंमत तब्बल १ कोटी १९ लाख इतकी आहे. मुंबई १३, कोकण विभाग ६, पुणे ८ आणि छत्रपती संभाजीनगर ३ अशा महाराष्ट्रातील ३० ठिकाणच्या हॉटेल- रेस्टॉरंट्सचे एफडीएकडून अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये मुंबईतील काळबादेवी, धारावी, कुलाबा, परळ, लोअर परळ, फोर्ट, बांद्रा पश्चिम, सांताक्रुझ पश्चिम, जोगेश्वरी पश्चिम, खार पश्चिम, विलेपार्ले आणि चेंबूर या परिसरातील हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये धडक कारवाई केलेली आहे.

# तहसीलदार धीरज मांजरे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने एम.बी.ए. व एम.सी.ए. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला दिशा




युवावार्ता (प्रतिनिधी)

शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.बी.ए. इन्स्टिट्यूट, संगमनेर येथे एम.बी.ए. व एम.सी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. संगमनेर तालुक्याचे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी मा. धीरज मांजरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार धीरज मांजरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ध्येय निश्चिती, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वेळेचे नियोजन, कौशल्यविकास आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व स्पष्ट केले. बदलत्या औद्योगिक व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता सतत नवीन ज्ञान व कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सक्षम व रोजगारक्षम बनवावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून तहसीलदार धीरज मांजरे यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या अनुभवाधारित मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षा, प्रशासकीय सेवा, करिअरच्या विविध संधी आणि व्यक्तिमत्त्व विकासाबाबत प्रेरणा मिळाली.

यावेळी बी.एड. कॉलेजचे प्रा. डॉ. राजू शेख यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत नव्या शैक्षणिक प्रवासासाठी सकारात्मक दृष्टिकोन व सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सेक्रेटरी डॉ. राजेंद्र लड्डा तसेच सीईओ श्री. रुपेश वालझाडे यांनी एम.बी.ए. व एम.सी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक डॉ. नितीन झावरे, विभागप्रमुख डॉ. किरण गोंटे, कार्यक्रम समन्वयक प्रा. संतोष खामकर व प्रा. महेश पावडे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच एम.बी.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भेळ-भत्त्यातून १४० जणांना विषबाधा; मालेगावात खळबळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथे भरलेल्या आठवडे बाजारात विक्रीस असलेल्या भेळ भत्त्यातून तब्बल १४० जणांना विषबाधा (त्रेब झेळीपळपस) झाल्याची अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. विषबाधा झालेल्या नागरिकांमध्ये लहान मुलांची संख्या लक्षणीय असून, नांदगाव बुद्रुकसह चिंचावड, गुंजाळवाडी आणि डोंगरगाव येथील ग्रामस्थांचा यामध्ये समावेश आहे. सुदैवाने, वेळेवर वैद्यकीय मदत मिळाल्यामुळे सर्व रुग्णांची प्रकृती आता स्थिर असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे.नांदगाव बुद्रुक येथील साप्ताहिक बाजारात परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली होती. बाजारातील एका स्थानिक दुकानदाराकडून खरेदी केलेला भेळ भत्ता खाल्ल्यानंतर काही वेळातच नागरिकांना तीव्र मळमळ, पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि तापाचा त्रास सुरू झाला. एका पाठोपाठ अनेक नागरिकांना, विशेषतः लहान मुलांना त्रास होऊ लागल्याने परिसरात एकच घबराट पसरली. ग्रामस्थांनी तातडीने रुग्णवाहिका आणि खासगी वाहनांच्या मदतीने सर्व बाधितांना मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल केलेसरकारी रुग्णालयात एकाच वेळी १४० हून अधिक रुग्ण दाखल झाल्याने सुरुवातीला मोठी धावपळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच मालेगाव शहरातील अनेक खासगी डॉक्टरांनी सामाजिक भान जपत थेट सरकारी रुग्णालयात धाव घेतली. त्यांनी सरकारी डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून रुग्णांवर तातडीने उपचार सुरू केले. रुग्णांच्या प्रकृतीबाबत माहिती देताना अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ. मोमीन यांनी सांगितले की, रुग्णालयात दाखल झालेल्या सर्व रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर असून कोणीही धोक्यात नाही. वैद्यकीय पथक सर्व रुग्णांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.घटनेची माहिती मिळताच राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तातडीने मालेगाव सामान्य रुग्णालयाला भेट दिली. त्यांनी रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची आवर्जून विचारपूस करून त्यांना धीर दिला. तसेच उपस्थित आरोग्य यंत्रणेला रुग्णांवर आवश्यक ते सर्व सर्वोत्तम वैद्यकीय उपचार करण्याचे कडक निर्देश दिले.

नागरिकांनी घाबरून न जाण्याचे आवाहन करत मंत्री भुसे यांनी या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

# जिथे माझी गरज लागेल तेथे मदतीसाठी मी कटीबद्ध -आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अध्यात्म, संस्कार, सदाचार आणि भक्तीच्या माध्यमातून समाजामध्ये सकारात्मक विचार रुजविण्याचे महत्त्व यासारख्या धार्मिक कार्यक्रमातून मिळत असते त्यामुळे तुम्हाला जिथे जिथे माझी गरज लागेल, तिथे मी मदतीसाठी कायम तुमच्या मागे भक्कम पणे उभा राहीन अशी ग्वाही आ. अमोल खताळ यांनी श्री चक्रधर स्वामी भाविक भक्तांना दिली. संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे श्रीकृष्ण सत्संग महानुभाव सेवा मंडळाच्यावतीने आयोजित सर्वज्ञ श्री गोविंदप्रभू जन्मोत्सव सोहळा व श्रीकृष्ण सत्संग सद्भक्त संमेलन भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या सोहळ्यास आ. खताळ यांनी उपस्थित राहून सर्वज्ञ श्री गोविंदप्रभूंचे दर्शन घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दादे राज बाबा अंजनगावकर व श्रीकृष्ण सत्संग सेवा मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते व संगमनेर तालुक्यातील सर्व भाविक उपस्थित होते. आ. खताळ म्हणाले की सर्वज्ञ श्री गोविंदप्रभू यांनी दिलेल्या आचार-विचार यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार कसा करावा, एकनिष्ठ धर्माचरणातून जीवनाला योग्य दिशा कशी द्यावी तसेच मोक्षमार्गाची वाटचाल कशी करावी, संत महंत यांच्या विचारांचे श्रवण आणि त्यांच्या सहवासातून मिळणारे मार्गदर्शन समाजाला संस्कारक्षम आणि सकारात्मक दिशा देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते असे सांगून ते म्हणाले की आतापर्यंत माझा शासकीय निधी मंदिरांच्या सभा मंडपासाठी दिला असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

# महाराष्ट्राच्या युवाशक्तीला नवी दिशा देणारा आश्वासक चेहरा - आ. सत्यजित तांबे




**वाढदिवसाच्या निमित्ताने मी पाहिलेले सत्यजित दादा....**

केवळ स्नेहसंबंध नसून एका कुटुंबासारखे राहिले आहेत. सत्यजीत दादांचा पहिला वाढदिवस असो किंवा त्यांचे बालपण... माझ्या अंगा-खांद्यावर खेळलेले हेच दादा आज आमदार म्हणून राजकारणात आणि समाजकारणात समर्थपणे एक सक्षम नेतृत्व म्हणून उभे आहेत, याचा मला आणि आमच्या संपूर्ण परिवाराला कायमच सार्थ अभिमान वाटतो. गेल्या ४० वर्षांपासून जोपासलेली ही आपुलकी, विश्वासाची वीण आणि जिव्हाळ्याचे संबंध काळाच्या ओघात केवळ टिकूनच राहिले नाहीत तर दिवसेंदिवस अधिक घट्ट आणि वृद्धिंगत होत चालले आहेत. हा प्रवास माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे.

वाढदिवसानिमित्त सत्यजीत दादांना सुदृढ आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि जनसेवेतील त्यांची ही यशस्वी वाटचाल अशीच उत्तरोत्तर प्रगतीपथावर राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना! सामाजिक आणि लोकहिताच्या कार्यात सहकाऱ्यांचा सहवास हा नेहमीच नवी ऊर्जा देणारा असतो. 'जय हिंद लोक चळवळ' आणि संग्राम संस्थेचे विश्वस्त म्हणून सत्यजित हे कार्यरत आहेत, तर मी संस्थेचा सेक्रेटरी म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. आमच्या या प्रवासात प्रत्येक मिटिंग निमित्त एकत्र येणे होते, आणि हा सहवास माझ्यासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरतो. त्यांच्याकडून मला प्रत्येक वेळी कामाची अचूकता, दूरदृष्टी आणि शिस्त यांविषयी खूप काही शिकायला मिळते. आमच्या प्रत्येक मिटींगमध्ये वरवरची चर्चा न होता, प्रत्येक विषयावर पॉइंट-टू-पॉइंट (मुद्देसूद) आणि सखोल चर्चा करण्याची त्यांची पद्धत अतिशय वाखाणण्याजोगी आहे.

या अशा विचारमंथनामुळे आणि विधायक चर्चेमुळे माझ्या ज्ञानात आणि कार्यपद्धतीत प्रचंड भर पडली आहे. त्यांच्यासारख्या अभ्यासू आणि समर्पित व्यक्तीसोबत काम करताना सामाजिक जाणिवा तर समृद्ध होतातच, शिवाय प्रशासकीय आणि संघटन कौशल्याचे नवनवीन धडेही नकळत मिळत जातात. हा सुसंवाद आणि सहकार्य असाच निरंतर राहो, हीच सदिच्छा! देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पटलावर आज एका अभ्यासू, सुसंस्कृत आणि दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाची नितांत गरज आहे. बौद्धिक क्षमता, कामाचा प्रचंड आवाका, प्रभावी वक्तृत्व आणि अत्याधुनिक व्यवस्थापनाची सांगड घालून समाजाला प्रगतीपथावर नेणाऱ्या मोजक्या नेत्यांमध्ये सत्यजित तांबे यांचे नाव आज महाराष्ट्राच्या राजकारणात अग्रक्रमाने घ्यावे लागेल. लहानपणापासूनच समाजकारणाची आवड असलेल्या सत्यजित तांबे यांनी केवळ पारंपारिक राजकारणावर अवलंबून न राहता स्वतःचे स्वतंत्र वलय निर्माण केले आहे. जगभरातील नामांकित हॉर्वर्ड विद्यापीठातून 'यंग लीडरशिप'चा अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी तरुणांच्या नेतृत्वाची आधुनिक दिशा समजून घेतली. न्यूयॉर्कचे माजी मेयर गॅविन न्यूसम यांच्या 'सिटिझन विले' या पुस्तकाचे त्यांनी केलेले मराठी भाषांतर तरुण राजकीय कार्यकर्त्यांसाठी एक मार्गदर्शक पुस्तक ठरले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यातून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्यातील पक्षीय भेद पलीकडील सुसंवाद व मैत्रीची प्रचिती आली जी आजच्या राजकारणात अत्यंत दुर्मिळ मानली जाते.

**सततचे वाचन, चिंतन आणि अद्ययावत अभ्यास**

राजकारण आणि समाजकारणाच्या अतोनात धावपळीतही त्यांचे शिक्षण थांबलेले नाही. अर्थशास्त्र (Economics), व्यवस्थापन (Management) आणि कायदा (Law) यांसारख्या विषयांचा त्यांचा नियमित अभ्यास सुरू असतो. वाचन, मनन आणि चिंतन हा त्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. विशेषतः उद्योग, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांवर सोशल मीडियाच्या माध्यमातून ते अत्यंत अभ्यासपूर्ण आणि आक्रमक मांडणी करतात जी आजच्या तरुण पिढीला भावते. याचमुळे राज्यभरात त्यांच्या मागे तरुणांचा मोठा वर्ग उभा राहिला आहे. ज्येष्ठ नागरिकही त्यांच्या या सुसंस्कृत आणि विचारी राजकारणाचे कौतुक करतात. डॉ. सुधीर तांबे यांच्या मोठ्या राजकीय त्यागातून मिळालेल्या संधीचे सोने करत सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेच्या व्यासपीठावरून सर्वसामान्यांचे प्रश्न अत्यंत आक्रमकपणे मांडले आहेत.

**तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न आणि त्यासाठीचा सातत्यपूर्ण आग्रह.**

**इंडियाबुल्सचा प्रश्न आणि नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाचा पाठपुरावा.,**

**शेतकऱ्यांचे प्रश्न आणि जैन साधूंच्या पायदळ प्रवासाच्या सुरक्षेचा मुद्दा.**

**शिक्षकांच्या आणि पदवीधरांच्या विविध मागण्या.**

युवकांसाठी एकाच छताखाली सर्व सुविधा मिळतील अशी 'अभ्यासिका केंद्रे' उभारण्याचा उपक्रम. (अवघ्या दीड वर्षात मतदारसंघात तब्बल ५० हुन अधिक अभ्यासिकांची निर्मिती हे त्यांच्या कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण आहे.)

**बहुआयामी व्यक्तित्व आणि कौटुंबिक जाणिवा**

राजकारणाच्या वर्तुळात वावरतानाही त्यांच्यातील संवेदनशील कलाकार कायम जिवंत राहिला आहे. निसर्गसौंदर्याची आणि साहित्याची जाण असणारे सत्यजित तांबे हे नातेवाईक, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांमध्ये रमणारे एक कुटुंबवत्सल व्यक्ती आहेत. मुलगी अहिल्या आणि चिरंजीव सूर्या यांच्यासोबतचे त्यांचे पालकत्व अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. साहित्य, कला, क्रीडा आणि सहकार या सर्वच क्षेत्रांत त्यांची खोल रुची आहे. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन 'रचनात्मक कामाला' कायम प्राधान्य देणारे सत्यजित तांबे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक आश्वासक आणि ऊर्जावान पर्व आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात युवक नेतृत्व, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख विचार यांचा समन्वय साधत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे सत्यजित तांबे. विद्यार्थी चळवळीपासून सुरू झालेला त्यांचा सार्वजनिक जीवनाचा प्रवास स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधित्व, युवक काँग्रेसमधील संघटनात्मक नेतृत्व आणि पुढे विधानपरिषदेतील लोकप्रतिनिधित्वापर्यंत पोहोचला. या संपूर्ण प्रवासात युवकांशी सातत्याने जोडलेले नाते, तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य व ग्रामीण विकास यांसारख्या प्रश्नांशी असलेली बांधिलकी हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे पैलू राहिले आहेत.सार्वजनिक जीवनाची आवड आणि सामाजिक प्रश्नांविषयीची जाणीव त्यांना कौटुंबिक वातावरणातून मिळाली. सार्वजनिक जीवनाची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात वाढताना समाजातील विविध प्रश्न आणि राजकीय प्रक्रियेचा जवळून परिचय त्यांना झाला. मात्र या पार्श्वभूमीपुरते त्यांचे सार्वजनिक जीवन मर्यादित राहिले नाही. युवकांच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडले जाण्याच्या उद्देशाने त्यांनी विद्यार्थी चळवळीतून आपल्या कार्याची सुरुवात केली. सन २००२ पासून छडणख आणि युवक काँग्रेसच्या माध्यमातून त्यांनी संघटनात्मक कामाला सुरुवात केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर काम करताना त्यांचा राज्यातील विविध भागांतील युवकांशी संपर्क वाढत गेला आणि पुढे हाच संपर्क त्यांच्या राजकीय-सामाजिक प्रवासाचा महत्त्वाचा आधार ठरला.

युवकांमध्ये काम करत असतानाच स्थानिक पातळीवरील विकासाच्या प्रश्नांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी त्यांना मिळाली. सन २००७ मध्ये अवघ्या २४व्या वर्षी ते अहमदनगर जिल्हा परिषदेवर निवडून आले. त्यानंतर २०१२ मध्येही त्यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून पुन्हा प्रतिनिधित्व केले. २००७ ते २०१७ या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून काम करताना ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणींचा त्यांना जवळून परिचय झाला. पाणी, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांसारखे प्रश्न केवळ सरकारी योजनांपुरते न राहता त्यांचा थेट संबंध सामान्य नागरिकांच्या जीवनमानाशी असतो, याची जाणीव या काळात अधिक दृढ झाली. स्थानिक स्वराज्य संस्थेतील या अनुभवाबरोबरच युवक काँग्रेसमधील त्यांची संघटनात्मक वाटचालही वेगाने पुढे जात होती. २००७ ते २०११ या काळात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर २०११ ते २०१८ या काळात उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. महाराष्ट्रासारख्या भौगोलिक आणि सामाजिकदृष्ट्या विविध राज्यात युवक संघटनेचे काम करताना त्यांचा राज्यातील अनेक जिल्ह्यांतील युवकांशी थेट संपर्क निर्माण झाला. संघटना ही केवळ पदाधिकारी आणि कार्यालयांपुरती मर्यादित न राहता गावागावातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, या भूमिकेतून त्यांनी तळागाळातील संघटनात्मक कामाला महत्त्व दिले.

या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे सन २०१८ ते २०२२ या काळात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाची त्यांनी सांभाळलेली जबाबदारी. अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी राज्यभर युवक कार्यकर्त्यांशी संवाद वाढवण्यावर आणि संघटन अधिक व्यापक करण्यावर भर दिला. महाराष्ट्राच्या विविध भागांत दौरे करताना त्यांनी स्थानिक युवकांच्या समस्या, अपेक्षा आणि सामाजिक प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला. शहरांबरोबरच ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवकांना संघटनेच्या प्रवाहात सहभागी करून घेण्यावर त्यांनी भर दिला. कार्यकर्ता बैठका, युवक मेळावे, प्रशिक्षण उपक्रम आणि विविध सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना सार्वजनिक जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न या काळात करण्यात आला. युवक काँग्रेसचे नेतृत्व करताना त्यांच्यासमोर केवळ संघटना वाढवण्याचे आव्हान नव्हते; तर बदलत्या काळातील युवकांच्या अपेक्षा समजून घेण्याचेही आव्हान होते. शिक्षण पूर्ण करूनही रोजगाराच्या संधींचा अभाव, कौशल्य विकासाची गरज, उच्च शिक्षणातील अडचणी, ग्रामीण भागातील मर्यादित संधी आणि सार्वजनिक जीवनातील युवकांचा कमी होत जाणारा सहभाग अशा विविध प्रश्नांशी युवक झगडत होते.

२०१८ ते २०२२ या काळात त्यांनी राज्यभरातील युवक कार्यकर्त्यांचे व्यापक जाळे उभे करण्यावर भर दिला. विविध जिल्ह्यांतील स्थानिक नेतृत्वाला संधी देणे, नव्या कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामाचा अनुभव देणे आणि युवकांना सामाजिक प्रश्नांवर काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे या माध्यमातून संघटनेचा विस्तार करण्याचा प्रयत्न झाला. या काळात निर्माण झालेले कार्यकर्त्यांशी संबंध पुढील सार्वजनिक जीवनातही त्यांच्या कामाचा महत्त्वाचा आधार ठरले. राजकीय संघटनेतील जबाबदाऱ्यांसोबतच सामाजिक क्षेत्रातील कामाशीही त्यांचा संबंध कायम राहिला. युवक, विद्यार्थी, महिला, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सहभाग आणि विकासाच्या विविध विषयांवर त्यांनी काम केले. जयहिंद लोकचळवळीसारख्या उपक्रमांमधून युवकांना सामाजिक कार्याशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. सार्वजनिक जीवनाकडे पाहताना केवळ निवडणुका आणि राजकीय पदे यापलीकडे समाजातील विविध घटकांशी संवाद साधणे आणि त्यांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे, अशी कार्यपद्धती त्यांच्या कामातून दिसून आली. शिक्षण हा त्यांच्या सार्वजनिक कार्यातील सातत्याने पुढे आलेला विषय आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी मिळणे, युवकांना कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, तसेच बदलत्या अर्थव्यवस्थेत तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक वातावरण निर्माण होणे या विषयांवर त्यांनी भर दिला. शिक्षणाकडे केवळ पदवी मिळवण्याचे साधन म्हणून न पाहता ते व्यक्ती आणि समाजाच्या विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून पाहण्याची भूमिका त्यांच्या सार्वजनिक कार्याशी जोडलेली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेपासून युवक काँग्रेसच्या राज्यस्तरीय नेतृत्वापर्यंतचा अनुभव घेतल्यानंतर त्यांच्या सार्वजनिक जीवनात आणखी एक महत्त्वाचा टप्पा आला. २०२३ मध्ये नाशिक पदवीधर मतदारसंघातून त्यांनी विधानपरिषदेची निवडणूक लढवली आणि विजयी झाले. या विजयासह त्यांचा प्रवास युवक संघटनेच्या नेतृत्वापासून व्यापक लोकप्रतिनिधित्वाच्या पातळीवर पोहोचला. नाशिक विभागातील पदवीधर मतदारसंघाचे भौगोलिक क्षेत्र व्यापक असल्याने या जबाबदारीमुळे शिक्षण, रोजगार, युवकांचे प्रश्न आणि प्रादेशिक विकासाशी संबंधित मुद्दे अधिक व्यापक पातळीवर मांडण्याची संधी त्यांना मिळाली. विधानपरिषदेत प्रवेश केल्यानंतर त्यांच्या सार्वजनिक कार्याचा केंद्रबिंदू अधिक व्यापक झाला. युवक आणि पदवीधरांच्या प्रश्नांसोबत शिक्षण, रोजगार, आरोग्य, ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा, उद्योजकता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा यांसारखे विषय त्यांच्या सार्वजनिक भूमिकेचा भाग बनले.

सत्यजित तांबे यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रवास पाहिला तर त्यात एक सातत्यपूर्ण धागा दिसून येतो- युवकांशी संवाद आणि समाजातील प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडलेले राहणे. विद्यार्थी चळवळीतून सुरू झालेली वाटचाल जिल्हा परिषदेपर्यंत पोहोचली; जिल्हा परिषदेतील ग्रामीण विकासाचा अनुभव युवक काँग्रेसच्या संघटनात्मक नेतृत्वात उपयोगी ठरला आणि युवक काँग्रेसमधील राज्यव्यापी कामाचा अनुभव पुढे लोकप्रतिनिधी म्हणून व्यापक पातळीवर काम करण्यासाठी आधारभूत ठरला. त्यांच्या प्रवासातील प्रत्येक टप्प्याने त्यांना सार्वजनिक जीवनाचा वेगळा अनुभव दिला. विद्यार्थी कार्यकर्ता म्हणून युवकांचे प्रश्न समजून घेण्यापासून ते जिल्हा परिषद सदस्य म्हणून ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यापर्यंत, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभरातील कार्यकर्त्यांना संघटित करण्यापासून ते विधानपरिषद सदस्य म्हणून व्यापक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्यापर्यंत त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढत गेली. आज त्यांच्या सार्वजनिक जीवनाकडे पाहताना हा प्रवास केवळ विविध राजकीय पदांची मालिका म्हणून पाहता येत नाही. त्यामागे संघटन उभारण्याचा अनुभव, युवकांना सार्वजनिक जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न, ग्रामीण भागातील विकासाचा प्रत्यक्ष अनुभव आणि शिक्षण व रोजगारासारख्या प्रश्नांना महत्त्व देणारी सार्वजनिक भूमिका अशी अनेक अंगांनी विकसित झालेली वाटचाल आहे.

युवक कार्यकर्ता म्हणून सुरू झालेल्या या प्रवासाने अनेक टप्पे पार केले आहेत. प्रत्येक टप्प्यावर नवे अनुभव, नवी जबाबदारी आणि व्यापक होत गेलेले कार्यक्षेत्र यांची भर पडत गेली. त्यामुळे सत्यजित तांबे यांचा सार्वजनिक जीवनातील प्रवास हा एका पदापासून दुसऱ्या पदापर्यंत जाणारा प्रवास न राहता युवक नेतृत्व, संघटन, सामाजिक बांधिलकी आणि लोकप्रतिनिधित्व यांचा विस्तारत गेलेला प्रवास म्हणून मांडला आहे.



**डॉ.नामदेव गुंजाळ**
**संगमनेर, मो. ९८२२०६०६०४**

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## खंदक आखाडा येथील दत्त मंदिरात चोरी

### दानपेटीसह पंचधातूच्या मूर्ती व मंदिरातील साहित्य लंपास



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - खंदक आखाडा, राजापूर ता. संगमनेर येथील श्री दत्त मंदिरात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास चोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सोमवारी रात्री १२ ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून दानपेटीसह विविध धार्मिक वस्तू चोरून नेल्या आहेत.

मंदिर समितीने दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मंदिरातील दानपेटी, पंचधातूची कासवाची मूर्ती, पंचधातूच्या गाय व वासराच्या मूर्ती, मंदिरातील घंटा तसेच अन्य अनेक वस्तू लंपास केल्या आहेत. या घटनेमुळे परिसरातील भाविक व ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. मंदिर परिसरात घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे मंदिराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

चोरीच्या घटनेबाबत कोणत्याही व्यक्तीची संशयास्पद हालचाल, व्यक्ती किंवा माहिती आढळल्यास ती तातडीने श्री दत्त मंदिर समितीला कळवावी. असे आवाहन मंदिर समितीने केले आहे. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, चोरीचा तपास करून चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. मंदिर परिसरातील सीसीटीव्ही अथवा अन्य उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपासाला दिशा मिळण्याची शक्यता आहे.

## उपवर्गीकरणासाठी मातंग समाजाचा मोर्चा

मुंबई (वृत्तसंस्था)

अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील उपवर्गीकरणावरून राज्यात वातावरण तापलेले असतानाच मुंबईत आज मोठी घडामोड घडली. उपवर्गीकरण लागू करावे यासाठी मातंग समाजाने आंदोलन केले. या आंदोलनावेळी मंत्रालय ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल हा रस्ता बंद करण्याचा प्रयत्न आंदोलकांनी केला. त्यामुळे या परिसरातील वाहतूक कोंडी निर्माण झाली. पोलिसांनी तातडीने आंदोलकांची धरपकड सुरू केली. काही आंदोलनकांना ताब्यात घेतले. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झडपट झाल्याचे दिसून आले. आझाद मैदानाच्या बाहेर आंदोलक आक्रमक झाले. आता पोलीस बॅरिकेटिंग लावत आहेत. पण काही काळ या परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. हा परिसर घोषणांनी दणाणून गेला आहे. पोलिसांचा मोठा बंदोबस्त या ठिकाणी लावण्यात आलेला आहे.आज आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आज लाखोंच्या संख्येने समाज बांधव आझाद मैदानात येणार आहे. अनुसूचित जाती मधील आरक्षणचा फायदा या काही मोजक्या समाजाने घेतला होत यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने निरीक्षण नोंदवून हे अनुसूचित जाती मधील आरक्षणच उपवर्गीकरण झाला पाहिजे असा निर्णय दिला आहे पण याची अंमलबजावणी ही राज्य सरकार कडून करण्यात येत नसल्यामुळे आम्हाला हे आज आंदोलन करावं लागत असल्याची प्रतिक्रिया विधानपरिषदेचे भाजप आमदार अमित गोरखे यांनी दिली.

आम्हाला कोणाच्या ताटातील आरक्षण नको आहे आम्हाला आमच्या हक्काच आरक्षण हवं आहे आणि आमची लोकसंख्या किती तेवढं आरक्षण आम्हाला हव आहे ही आमची साधी मागणी आहे आणि या मागणीला इतर समाज देखील पाठिंबा देतील. कोण या आंदोलनाला विरोध करत आहे हे मला माहीत नाही पण आज अनुसूचित जातीमधील सर्व समाज घटकातील बांधव हे सजग झाले आहेत आणि ते आपल्या हक्कांसाठी लढत आहेत.

## दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करा, परीक्षा शुल्कही घेऊ नका

### छात्रभारतीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च भागविणे पालकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची केवळ परीक्षा फी माफ न करता प्रवेश फी तसेच संपूर्ण शैक्षणिक फी माफ करावी, अशी मागणी छात्रभारतीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे करण्यात आली.

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काबाबत शासनाने निर्णय घेतला असला, तरी केवळ परीक्षा शुल्कमाफी हा विद्यार्थ्यांना पुरेसा आर्थिक दिलासा ठरणार नाही. परीक्षा शुल्काच्या तुलनेत प्रवेश शुल्क आणि इतर शैक्षणिक शुल्काची रक्कम अधिक असल्याने दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवण्यासाठी सरकारने व्यापक शुल्कमाफीचा निर्णय घेणे गरजेचे असल्याचे छात्रभारतीने म्हटले आहे.

दुष्काळग्रस्त भागातील इयत्ता १०वी व १२वीच्या विद्यार्थ्यांकडून बोर्ड परीक्षा शुल्क आकारू नये, अशी मागणीही करण्यात आली आहे. शासनाने शुल्कमाफीचा निर्णय घेतल्यानंतरही काही ठिकाणी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केले जात असल्याचा दावा छात्रभारतीने केला आहे. काही विद्यार्थ्यांकडून शुल्क आधीच वसूल करण्यात आले असून, ते परत करण्याचे स्पष्ट आदेश संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधनच संकटात आले असताना विद्यार्थ्यांनी फी भरायची कुठून, असा सवाल छात्रभारतीने उपस्थित केला. विद्यार्थ्यांकडून आधी शुल्क घेऊन नंतर त्याच रकमेचा परतावा करण्याची प्रक्रिया राबविण्याऐवजी शासनाने सुरुवातीपासूनच शुल्कमाफी लागू करावी, अशी भूमिका संघटनेने मांडली. छात्रभारतीने शासनाकडे दुष्काळग्रस्त १०वी-१२वीच्या विद्यार्थ्यांकडून कोणतेही बोर्ड परीक्षा शुल्क न घेणे, आवश्यक परीक्षा शुल्क शासनाने थेट महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला उपलब्ध करून देणे, आधी वसूल केलेले शुल्क विद्यार्थ्यांना परत करणे, अनधिकृत शुल्कवसुली रोखण्यासाठी शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना स्पष्ट निर्देश देणे तसेच दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांची प्रवेश फी व संपूर्ण शैक्षणिक फी माफ करण्याची मागणी केली आहे.

दुष्काळामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबू नये यासाठी शासनाने केवळ परीक्षा शुल्कमाफीपुरता निर्णय मर्यादित न ठेवता संपूर्ण शैक्षणिक शुल्कमाफीचा तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी छात्रभारतीने केली आहे.

यावेळी छात्रभारतीचे राज्य अध्यक्ष अनिकेत घुले, सदस्य मोहम्मद कैफ तांबोळी, अभिषेक वैराळ, सोहम घुले, अनिकेत खरात, धीरज रहाणे, ओम् उगले, राज वाकळे, साहिल आहेर, सातपुते रवींद्र, विशाल कडलक, आयुष फुलसुंदर, आदित्य देशमुख, काळे निखिल, फटांगरे साहिल आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अकोले-कोल्हार राज्य मार्गावर भीषण अपघात

### इनोव्हा आणि मोटारसायकलची समोरासमोर धडक; तिघे गंभीर जखमी





युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले शहरातून जाणाऱ्या कोल्हार-घोटी राज्य मार्गावरील अंबड फाट्यावर इनोव्हा गाडी आणि मोटारसायकल यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. रविवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या या अपघातात मोटार सायकलवरील तिघे जण गंभीर जखमी झाले असून त्यांना अकोले येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. राजूरहून अकोल्याला जाणारी इनोव्हा गाडी (एमएच १७ ए ९७९७) चुकीच्या बाजूने भरधाव वेगाने जात असताना, अकोल्याहून रुंभोडीच्या दिशेने जाणाऱ्या मोटारसायकलला (एमएच १७वाय ३३९४) तिची जोरदार धडक बसली. ही धडक इतकी भीषण होती की इनोव्हा गाडीच्या पुढच्या भागाचे मोठे नुकसान झाले असून, मोटारसायकलचाही चक्काचूर झाला आहे.

या अपघातात मोटारसायकलवरील एक पुरुष, एक महिला आणि एक लहान मुलगी गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर तातडीने रुग्णवाहिका बोलावून जखमींना अकोले येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. काहींनी इनोव्हा गाडीतील लोकांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला, मात्र मध्यस्थीनंतर वातावरण शांत झाले. अकोले पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतल्यानंतर परिस्थिती निवळली.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू । कांजीवरम । सिल्क
पैठणी । बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist



डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25